# उल्हासनगर महानगरपालिका

**ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सामान्य प्रशासन विभाग, दुसरा मजला, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर-४२१००३
दुरध्वनी क्र.- ०२५१- २७२०११६ विस्तार क्र- २०८ फॅक्स- ०२५१-२७२०१०४


## सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे बाबत.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ नुसार आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका हे सेवानिवृत्त उप अभियंता (स्थापत्य/ विद्युत/ यांत्रिकी), सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य/ यांत्रिकी), सेवानिवृत्त कामगार अधिकारी (गट अ/ब), आगार व्यवस्थापक (गट अ/ब), सहाय्यक आगार व्यवस्थापक(गट अ/ब), प्रशासकीय अधिकारी आस्थापना विषयक (गट अ/ब), उद्यान अधिक्षक/उद्यान अधिकारी (गट अ/ब) (Horticulture) तसेच उद्यान अधिक्षक इत्यादी कामा करीता सेवानिवृत्त वर्ग-१ व वर्ग-२ दर्जाचे अधिकारी यांच्या सेवा करारपध्दतीने घेणे करीता पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. संबंधीत अधिका-यांनी दिनांक २१ /११ /२०२३ ते ३० /११ /२०२३ सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज व आवश्यक कागदपत्र सामान्य प्रशासन विभाग, दुसरा मजला, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर-३ येथे स्विकारले जातील. उपरोक्त नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपात करण्यात येईल. अर्जाचा नमुना, इतर तपशिल व अटी शर्ती www.umc.gov या उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर पी.डी.एफ. स्वरूपात उपलब्ध आहे.

### प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेची लोकसंख्या वाढलेली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार पाच लक्ष सहा हजार सत्यानऊ एवढी लोकसंख्या आहे. २०२१ च्या जनगणना झालेली नसून संभाव्य लोकसंख्या (सात लाख) एवढी आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे कामकाज वाढले आहे.

महानगरपालिकेत पाणी पुरवठा विभागात केंद्रपुरस्कृत यांजना अमृत योजना २.०, अंतर्गत मलनि:सारण यांजना (रु. ४०४ कोटी ) व पाणी पुरवठा वितरण व्यवस्था शिल्लक कामे (रु. १२६ कोटी) तसेच प्रस्तावित स्व.उद्धव पाणी पुरवठा योजना (रु. १३१ कोटी) तसेच स्वच्छ भारत मिशन ७.०, माझी वसुंधरा, PM – Swanidhi, इत्यादी अनेक योजना सुरू आहे. दैनंदिन कामे सांभाळून वेळोवेळी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजना, उपक्रमांसाठी उपलब्ध मनुष्यबळात काम करावे लागत आहे. सद्यस्थितीत बांधकाम विभाग,

पाणी पुरवठा विभागात अनुक्रमे प्रभारी शहर अभियंता व कार्यकारी अभियंता काम करत आहेत. पाणी पुरवठा विभागात अनेक रिक्त पदे असल्याने तसेच वाढती लोकसंख्या व नागरिकांना विविध सोयी सुविधा पुरविणे यासाठी विविध विभागात त्या त्या विभागाची विविक्षित कामे करण्यासाठी सेवानिवृत्त अधिकारी यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य / यांत्रिकी) | २ |
| २ | उप अभियंता (स्थापत्य/ विद्युत/ यांत्रिकी ) | ०५ |
| ३ | कामगार अधिकारी (गट अ/ब) | १ |
| ४ | आगार व्यवस्थापक (गट अ/ब) | १ |
| ५ | सहाय्यक आगार व्यवस्थापक(गट अ/ब) | १ |
| ६ | प्रशासकीय अधिकारी (आस्थापना विषयक)(गट अ/ब) | १ |
| ७ | उद्यान अधिक्षक/उद्यान अधिकारी (गट अ/ब) (Horticulture) | १ |
| ८ | शाखा अभियंता | १० |

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) उपरोक्त नमूद विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा वर नमुद केल्या प्रमाणे किमान वर्षांचा अनुभव ही पूर्व अट ठेवण्यात येत आहे. (अर्जा सोबत अनुभव प्रमाणपत्र अथवा सदर पदावरील आदेश व कार्यकाळ)

२) विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करुन देण्यात येईल. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त १ वर्ष कालावधी साठी देण्यात येईल. परंतू नियुक्तीस वाढीव कालावधीकरिता मुदतवाढ द्यायचे झाल्यास शासन निर्णयानुसार नुतनीकरण करता येईल.

३) सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करताना त्यांना सेवा निवृत्ती पूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.

४) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत / सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

५) करार पध्दतीने नियुक्ती करताना कमाल वयोमर्यादा ही शासन निर्णय १७.१२.२०१६ मध्ये नमूद केले प्रमाणे असावी.

६) असा सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

७) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच इतर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी वउमेदवारांकडुन नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही. यांचा समावेश करुन सदर अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेख करण्यात यावा.

८) अशा अधिकारी/ कर्मचा-याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किवा प्रस्तावित नसलेबाबत संबंधित विभागाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक. किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

९) नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१०) असा अधिकारी/कर्मचारी त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल. अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

११) अशा अधिकारी/कर्मचारी यांनी conflict of interest जाहिर करणे आवश्यक राहील.

१२) अशा करार पध्दतीवरील अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्री बाबत गोपनीयात पाळणे आवश्यक राहील.

१३) नियुक्ती अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेरुन कामाचे मुल्यमापन करतील.

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

(अशोक नाईकवाडे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
उल्हासनगर महानगरपालिका

ठिकाणः उल्हासनगर
दिनांकः २१ /११/२०२३

# उल्हासनगर महानगरपालिका

**ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सामान्य प्रशासन विभाग, दुसरा मजला, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर-४२१००३

दुरध्वनी क्र.- ०२५१- २७२०११६ विस्तार क्र- २०८ फॅक्स- ०२५१-२७२०१०४


## सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे बाबत.

### संक्षिप्त जाहिरात

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ नुसार आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका हे सेवानिवृत्त उप अभियंता (स्थापत्य/ विद्युत/ यांत्रिकी), सेवानिवृत्त शाखा अभियंता (स्थापत्य/ यांत्रिकी), सेवानिवृत्त कामगार अधिकारी (गट अ/ब), आगार व्यवस्थापक (गट अ/ब), सहाय्यक आगार व्यवस्थापक(गट अ/ब), प्रशासकीय अधिकारी आस्थापना विषयक (गट अ/ब), तसेच उद्यान अधिक्षक/उद्यान अधिकारी (गट अ/ब) (Horticulture) इत्यादी कामा करीता सेवानिवृत्त वर्ग-१ व वर्ग-२ दर्जाचे अधिकारी यांच्या सेवा करारपध्दतीने घेणे करीता पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. संबंधीत अधिका-यांनी दिनांक २१ /११ / २०२३ ते ३०/ ११ /२०२३ सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज व आवश्यक कागदपत्र सामान्य प्रशासन विभाग, दुसरा मजला, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर-३ येथे स्विकारले जातील. उपरोक्त नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपात करण्यात येईल. अर्जाचा नमुना, इतर तपशिल व अटी शर्ती www.umc.gov या उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर पी.डी.एफ. स्वरूपात उपलब्ध आहे.

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

(जमीर लेंगरेकर)
अतिरिक्त आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

ठिकाणः उल्हासनगर
दिनांकः २१ /११/२०२३

# उल्हासनगर महानगरपालिका

## अर्जाचा नमुना

प्रति,
मा. आयुक्त,
महानगरपालिका उल्हासनगर.

विषय :- सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने मी विनंती पूर्वक अर्ज करतो/करते की, मी शासन निर्णय दि. १७/१२/२०१६ मधील अटी व शर्ती पुर्ण करीत असून वरील विषयात नमूद केलेल्या कामाच्या अनुषंगाने काम करण्यास इच्छुक असून माझी खाली नमूद केल्यानुसार माहिती सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांचे पुर्ण नाव | |
| २. | पत्रव्यवहाराचा पत्ता/ संपर्क दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक/email id | |
| ३. | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद व विभाग | |
| ४. | शासकीय सेवेत आल्याचा दिनांक/शासकीय सेवेत आल्यापासून सेवानिवृत्ती पर्यंत धारण कलेली पदे व कार्यालय | |
| ५. | सेवा निवृत्तीचा दिनांक | |
| ६. | अर्जाच्या दिनांकास पूर्ण वय | |
| ७. | सेवानिवृत्ती पूर्वी मिळत असलेले वेतन (संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र) | |
| ८. | अर्जदार सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसलेबाबतचे संबंधित विभागाचे प्रमाणपत्र | |
| ९. | विवक्षित कामाच्या अनुषंगाने प्रवास करावा लागल्यास तसे हमी पत्र सोबत जोडणे आवश्यक | |
| १०. | सद्यस्थितीत मिळत असलेले सेवानिवृत्ती वेतन (संबंधित कोषागार कार्यालयाचे प्रमाणपत्रासह) | |

(टिप — सोबत आवश्यक ती कागदपत्रे स्वसाक्षांकित करून जोडण्यात यावीत.)

स्थळ :-
दिनांक :-

स्वाक्षरी
(पूर्ण नांव)